स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229242
Fax : (02462) 229574

NATONAL SERVICE SCHEME DEPARTMENT
Website: wwwsrtmun.ac.in E-mail: srtmunss2018@gmail.com

जा.क्र. : रासेयो/२०१९–२०/51A

दिनांक : १४ /०९/२०२०

R.S. COLLEGE, LATUR
Inward No. 11736
Date 19/3/2021

प्रति,
मा.प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी,
राजर्षी शाहू महाविद्यालय,
लातूर.

महोदय,

राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम अंतर्गत दि. ०७ ते ०९ मार्च २०२० दरम्यान आपल्या महाविद्यालयाच्या रासेयो पथकाच्या वतीने प्रस्तुत विद्यापीठांतर्गत विद्यापीठस्तरीय युवती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठस्तरीय युवती कार्यशाळा कालावधीत आपण राबविलेले उपक्रम विद्यार्थीभिमुक व समाज परिवर्तनाच्या दृष्टीने नाविण्यपूर्ण होते. त्यामध्ये संवाद कौशल्ये आणि भाषा प्रभुत्व,पाऊल जपून टाकताना, स्पर्धा परीक्षा विषयक तयारी, अंधश्रध्दानिर्मूलन आणि महिला, सायबर क्रॉईम ब्रॅच आणि बरंच काही, महिला आणि त्यांचे न्यायिक अधिकार आदी विषयावरील व्याख्याने व जागतिक महिला दिना निमित्त महिला आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शन यांचे आयोजन अनुभव कथन, चर्चा सत्र इत्यादी युवतींचे नेतृत्व कौशल्य विकास करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण होते. आपल्या कुशल नेतृत्वखाली युवतींनी प्रत्यक्षपणे व्यक्तीमत्व विकासाचे प्रशिक्षण प्राप्त केले. महिला सक्षमीकरण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा उल्लेखनीय आहे. या प्रशिक्षीत स्वयंसेविकांची त्यांच्या महाविद्यालयातील रासेयो उपक्रम राबविण्यासाठी प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी यांना मदत होणार आहे. निवास, भोजन इत्यादी व्यवस्था उत्तम होती.

अत्यंत उत्कृष्ट व नियोजनबध्द पध्दतीने कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल आपले व आपल्या सर्व सहकारी वृदांचे हार्दिक अभिनंदन. यानंतरही रासेयो कार्यसाठी आपले सदैव सहकार्य राहिल हीच अपेक्षा.

आपण राबवत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सामजिक कार्यासाठी आपणास हार्दिक शुभेच्छा !

सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार.
धन्यवाद!!

डॉ.शिवराज बोकडे
संचालक
रासेय.विभाग,प्रस्तुत विद्यापीठ

Dr. K. D. Sawant
आपल्या कार्यास शुभेच्छा....
प्राचार्य
18.3.2021